**सिव्हील कामे :-**

अहवाल सालात कारखाना परिसरामध्ये चैनलिंक कंपौंड, जुने गेस्ट हाऊस नुतनीकरण आणि स्टाफ क्वॉर्टर, सेफ्टी टँक बांधकाम करणे इ. कामे करणेत आलेली आहेत

**संगणकीकरण :-**

वसंतदादा शुगर इन्स्टिट्युट, पुणे यांनी महाराष्ट्रातील साखर कारखान्याचे दैनंदिन कामकाजासाठी मराठीमध्ये अद्यावत ईआरपी सॉफ्टवेअर प्रणाली विकसित केलेली आहे. सदर सॉफ्टवेअर प्रणाली कारखान्याने खरेदी केलेली आहे.

कारखान्यातील वेगवेगळ्या विभागाचे कामकाज संगणकीय झालेले आहे. प्रत्येक खाते / विभागाचे कामकाजाचे आवश्यकतेनुसार संगणक व प्रिंटर उपलब्ध करुन दिलेले आहे. तसेच कारखान्याने ब्रॉडबॅन्ड इंटरनेट सेवा सुरु केलेली असून सेंट्रल एक्साईज ड्युटी, व्हॅट, व्यवसाय कर, प्रॉव्हीडंट फंड वगैरे ई-पेमेंटद्वारे आणि शासकीय आदेश, परिपत्रक आणि ई मेल इत्यादीसाठी इंटरनेट सेवेचा वापर करण्यात येत आहे.

**रिटेल/आऊटलेट/ डिझेल/पेट्रोल पंप :-**

कारखाना साईटवर सध्या इंडियन ऑईल कॉर्पो. लि., चा कंझुमर डिझेल/पेट्रोल पंप सुरु आहे. तथापी सदरचा पंप चालविणेस काही तांत्रीक अडचणी येत असल्याने इंडियन आईल कार्पो. लि., यांचेकडून कारखाना साईटवर रिटेल/आऊटलेट डिझेल/ पेट्रोल पंप सुरु करणेसाठी दि. ०४/०७/२०१७ रोजी लेटर ऑफ इंटेट मिळालेला आहे. त्यानुसार पंप उभारणी बाबतची कार्यवाही सुरु असून लवकरच पेट्रोल व डिझेल पंप कार्यान्वीत करणेत येत आहे.

**मनुष्यबळ विकास कार्यक्रम :-**

वैकुंठ मेहता राष्ट्रीय सहकारी प्रबंध संस्थान, पुणे व डॉ. विठ्ठलराव विखे पाटील सहकारी प्रबंध संस्थान, पुणे यांचे मार्फत कारखाना अधिकारी व कामगार/कर्मचाऱ्यांची कार्यक्षमता वाढवण्याचे दृष्टीने व साखर उद्योगातील अद्यावत तंत्रज्ञान अवगत होण्याचे दृष्टीने साखर विक्री (वायदे बाजार), नेतृत्व विकास कार्यक्रम, माहिती अधिकार कायदा ई. संदर्भात आयोजीत केलेल्या वेगवेगळ्या प्रशिक्षणासाठी कर्मचारी/कामगार पाठविले जातात. तसेच वसंतदादा शुगर इन्स्टिट्युट,पुणे यांचे मार्फत ऊस लागवड व संवर्धन,सुधारीत जातीचे जादा उतारा देणारे ऊस बेणे तसेच साखर प्रोसेसींगबाबत आयोजित केलेल्या वेगवेगळ्या प्रशिक्षणासाठी कर्मचारी/कामगार पाठविले जातात. सदर प्रशिक्षणापासून कारखाना कामगार/ कर्मचाऱ्यांना नवीन अद्यावत तंत्रज्ञान अवगत होते. तसेच त्यामधून मिळणाऱ्या ज्ञानामुळे संबंधीत कामगार / कर्मचारी यांचे ज्ञानामध्ये भर पडून कार्यक्षमताही वाढते व त्यामुळे कारखान्याच्या उत्पादन व कार्यक्षमतेमध्ये वाढ होणेस मदत होत आहे. मनुष्यबळ विकास कार्यक्रम अंतर्गत कर्मचाऱ्यांसाठी योग प्रशिक्षण शिबीर घेणेत येते.

**कामगार कल्याण योजना :-**

अहवाल सालात कामगार / कर्मचारी यांना २०१५-१६ मध्ये ८.३३% बोनस / सानुग्रह अनुदान देणेत आले. कामगारांच्या आर्थिक अडीअडचणी प्रसंगी श्री वृध्देश्वर सहकारी पगारदार पतसंस्थेमार्फत सहजरित्या कर्ज उपलब्ध होत आहे. महाराष्ट्र कामगार कल्याण मंडळामार्फत कामगार / कर्मचारी यांचे हुशार पाल्यांना शिष्यवृत्ती दिली जात आहे.



Scanned by CamScanner

**शैक्षणिक सुविधा :-**

कारखाना साईटवर अंगणवाडी व इ. १ ली ते ४ थी पर्यंत जिल्हा परिषद प्राथमिक शाळा आणि आदिनाथ कृषी विकास प्रतिष्ठान संस्थेचे इ. ५ वी ते १० वी पर्यंत न्यू इंग्लिश स्कूल (सेमी इंग्लिश) हे माध्यमिक विद्यालय आहे.

तसेच मा. श्री. दादापाटील राजळे शिक्षण संस्थेचे इ. ११ वी व १२ वी आर्टस् व सायन्स उच्च माध्यमिक आणि एफ.वाय ते टी.वाय. पर्यंत आर्टस् व सायन्स महाविद्यालय असून २०१३-१४ या शैक्षणिक वर्षापासून बी.एस्सी., (मॅथेमॅटीक्स,) कॉम्प्युटर व बॉटनी आणि एम.ए. मराठी व इंग्रजी आणि एम.एस्सी. (ॲनालेटीकल केमिस्ट्री) या पदव्युत्तर शिक्षणाची सोय देखील उपलब्ध करुन दिली आहे. तसेच डॉ. आण्णासाहेब शिंदे कृषी तंत्र निकेतन देखील चालविले जात आहे.

**वैधानिक लेखापरिक्षण :-**

२०१६-१७ वर्षाचे वैधानिक लेखापरिक्षण मे. कदम ॲण्ड कंपनी, चार्टर्ड अकौंटंट्स्, अहमदनगर यांनी मुदतीत पूर्ण केले आहे. तपासणी कालावधीमध्ये त्यांनी व त्यांचे सहकारी यांनी केलेल्या मार्गदर्शनाबद्दल आभारी आहोत.

**चिपाडापासून सहविजनिर्मितीसह अनुषंगिक मशिनरी आधुनिकीकरण :-**

कारखाना उभारणीच्या सुरवातीस कारखान्याची गाळप क्षमता ८०० मे. टन प्रतिदिनी होती. सदरच्या प्लॅन्टची उभारणी करतांना वेगवेगळ्या ठिकाणाहून जुनी मशिनरी खरेदी करुन सदरच्या प्रकल्पाची उभारणी करणेत आली व १९७६-७७ साली कारखान्याचा चाचणी गळीत हंगाम घेणेत आला.

प्रतिदिनी ८०० मे. टन गाळप क्षमता व प्रकल्पाची वापरणेत आलेली वेगवेगळ्या ठिकाणची जुनी मशिनरी यामुळे कारखाना किफायतशीर होत नसल्याने व ऊस उत्पादकांना वाजवी ऊसदर देता येत नसल्यामुळे तज्ञांच्या विचारे मशिनरीमध्ये बदल करुन १९९४-९५ मध्ये कारखान्याचे दैनंदिन ८०० मे. टनावरुन २५०० मे. टन गाळप क्षमता विस्तारीकरण करणेत आले आहे.

२५०० मे. टन गाळप क्षमतेच्या प्लॅन्टसाठी वापरण्यात आलेली मशिनरी २१ वर्षापूर्वीची जुनी झाली असल्याने व कारखान्यास स्टॅण्डर्ड नॉर्मसप्रमाणे निकष प्राप्त होत नाहीत. सध्याचे स्पर्धेच्या युगामध्ये कारखाना कायमस्वरुपी आर्थिकदृष्ट्या सक्षम होणेसाठी तसेच शेजारील इतर कारखान्याचे बरोबरीने ऊस उत्पादक / शेतकऱ्यांना वाजवी ऊस दर देता यावा म्हणून वसंतदादा शुगर इन्स्टिट्युट, मांजरी बु., जि. पुणे यांचे सल्ला/मार्गदर्शनाप्रनुसार १६ मेगावॅट क्षमतेचा सहविजनिर्मिती व तदनुषंगिक सुसंगत मशिनरी/ आधुनिकीकरण प्रकल्प उभारणीबाबत निर्णय झाला असून कारखान्यास भारत सरकार, वाणिज्य आणि उद्योग मंत्रालय, नवी दिल्ली योचेकडून १६ मेगावॅट क्षमतेचा विज निर्मिती प्रकल्प उभारणीसाठी IEM मिळाले आहे. कारखान्याचे कायमस्वरुपी पुनर्वसनाबाबत सहविजनिर्मिती प्रकल्पावर सुसंगत मशिनरी आधुनिकीकरण प्रकल्प उभारणीबाबत शासनाने शासनस्तरावर बैठकीचे आयोजन केले आहे. लवकरच प्रकल्प कार्यान्वीत करणेच्या दृष्टीने बैठक होवून पुढील कार्यवाही करणेत येईल.

शेवटी आभार व समारोप करणेपूर्वी सर्व सभासद बंधू भगिनींचे मुद्दाम निदर्शनास आणून देतो की, कारखान्याची पोटनियम दुरुस्ती होवुन कारखान्यास आदर्श पोटनियम लागू झालेले आहेत. त्यानुसार सभासदांनी भागाची अपूर्ण व थकीत रक्कम पूर्ण करणे, क्रियाशिल सभासद म्हणून राहणेसाठी मागील पाच गाळप हंगामापैकी किमान एका गळीत हंगामात ऊस पुरवठा केला पाहिजे. तसेच मागील पाच वर्षामध्यील सर्वसाधारण सभेपैकी किमान एका सर्वसाधारण सभेस हजर राहिले पाहिजे. सबब पोटनियमातील तरतुदीनुसार सदर पोटनियमाचे उलंघन झाल्यास सभासद अक्रियाशील म्हणून समजण्यात येइल व त्यामुळे अशा सभासदांना कारखान्याचे संचालक मंडळाचे निवडणुकीत भाग घेता येणार नाही, तदवतच मतदानाचाही अधिकार राहणार नाही, याची गांभीर्याने नोंद घ्यावी.



Scanned by CamScanner

**आभार व समारोप :-**

कारखान्याचे कामकाज प्रभावीपणे पार पाडण्यासाठी तसेच वेळोवेळी येणाऱ्या अडीअडचणीचे निवारण करण्यासाठी केंद्र व राज्य शासनाचे मंत्री मंडळातील मंत्री गण, लोकप्रतिनिधी, मा. साखर आयुक्त, म. रा. पुणे व त्यांचे कार्यालयातील अधिकारी, कर्मचारी तसेच प्रादेशिक सहसंचालक (साखर), अहमदनगर व त्यांचे कार्यालयातील अधिकारी, कर्मचारी आणि विशेष म्हणजे दि अहमदनगर डिस्ट्रिक्ट सेंट्रल को. ऑप. बँकेंचे चेअरमन व संचालक मंडळ आणि बँकेचे अधिकारी तसेच सहकार क्षेत्रातील पदाधिकारी, पत्रकार यांचेकडून वेळोवेळी मिळालेल्या बहुमोल सहकार्याबद्दल मी त्यांचे आभार मानून त्यांना धन्यवाद देतो. तसेच ज्या मान्यवरांनी आपले कारखान्यावर समक्ष येऊन भेटी दिल्या आहेत, त्यांचेही आभार मानून त्यांना धन्यवाद देतो. कारखान्याचे संचालक मंडळातील माझ्या आजी माजी सहकारी संचालकानी जे सहकार्य केले, त्याबद्दल त्यांचाही मी ऋणी आहे. कारखान्याचे सर्व सभासद, कार्यकारी संचालक, अधिकारी, कर्मचारी व कामगार, ऊस तोडणी वाहतूक मजूर व ठेकेदार यांनी कामकाजामध्ये मोलाची मदत केल्याबद्दल त्यांनाही धन्यवाद देतो.

आपण सर्व मान्यवरांनी प्रारंभापासूनच निष्ठापूर्वक साथ दिल्यामुळे आतापर्यंतची वाटचाल यशस्वी करु शकलो. याचा कृतज्ञता पूर्वक उल्लेख करणे हे माझे कर्तव्य समजतो व आपणा सर्वांना मन:पूर्वक धन्यवाद देतो. या उद्योगाचे यशस्वी वाटचालीत ज्या ज्ञात, अज्ञात व्यक्ती, ऊस पुरवठादार, विविध संस्था, कार्यकर्ते, व्यापारी व हिंतचिंतकांचा समावेश आहे. त्या सर्वांनी दिलेल्या सहकार्याबद्दल मन:पूर्वक धन्यवाद देऊन आपल्या कारखान्याची सतत प्रगती होत राहो अशी ''श्री वृध्देश्वर'' चरणी प्रार्थना करुन हा शेहेचाळीसावा वार्षिक अहवाल आपणापुढे सादर करीत आहे.

जय हिंद । जय सहकार ।।

आपला नम्र
**आप्पासाहेब दादाबा राजळे**
चेअरमन

वार - सोमवार
दिनांक- २५/०९/२०१७



Scanned by CamScanner

* वैधानिक लेखापरिक्षकांचा दाखला

* दि. ३१/०३/२०१७ रोजीचा ताळेबंद

* २०१६-१७ वर्षाचे नफा-तोटा पत्रक

* २०१८-१९ वर्षाचे अंदाज पत्रक

* सर्व सामान्य माहिती



Scanned by CamScanner

फॉर्म नं. एन.२
(कलम ८१ व नियम ६९ (३) प्रमाणे)
वैधानिक लेखापरिक्षकाचा अहवाल

**प्रति,**
**मा. चेअरमन/कार्यकारी संचालक**
श्री वृध्देश्वर सहकारी साखर कारखाना लि., आदिनाथनगर
ता. पाथर्डी, जि. अहमदनगर

**संदर्भ– अधिमंडळाची वार्षिक सर्वसाधारण सभा दिनांक २९/०८/२०१६ ठराव क्र. ०७**
**आर्थिक पत्रकांवरील वैधानिक लेखापरिक्षकाचा अहवाल.**

१) आम्ही श्री वृध्देश्वर सहकारी साखर कारखाना लि., आदिनाथनगर या संस्थेचे दिनांक ३१ मार्च २०१७ रोजीच्या आर्थिक पत्रकांचे म्हणजेच दिनांक ३१ मार्च २०१७ रोजीच्या ताळेबंदाचे, त्यासोबत जोडलेल्या त्या दिवशी संपणाऱ्या नफा–तोटा पत्रकाचे त्यासोबत जोडलेल्या हिशोबांच्या धोरणाचा अर्थपूर्ण सारांश आणि इतर स्पष्टीकरणात्मक माहितीचे की जे संस्थेच्या आर्थिक पत्रकाचा भाग यांचे दि. ०१/०४/२०१६ ते ३१/०३/२०१७ या कालावधीचे लेखापरिक्षण केलेले आहे.

**व्यवस्थापनाची आर्थिक विवरण पत्रकांबाबतची जबाबदारी–**

२) महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० आणि त्याखाली बनविलेले नियम या अन्वये आर्थिक पत्रके तयार करण्याची जबाबदारी हे संस्थेच्या व्यवस्थापनाची आहे. सदर जबाबदारीमध्ये आर्थिक पत्रके तयार करताना अपहार किंवा चूक यामुळे होणाऱ्या लक्षणीय चूकांपासून मुक्त राहील अशा प्रकारचे अंतर्गत नियंत्रण ठेवणेबाबत संकल्पना तयार करणे आणि ते अंमलात आणणे याचा समावेश असेल.

**लेखापरिक्षकाची जबाबदारी–**

३) आमची जबाबदारी ही आम्ही केलेल्या लेखापरिक्षणाचे आधारे सदर आर्थिक पत्रकांबाबतचे मत व्यक्त करण्याची आहे. भारतीय सनदी लेखापाल संस्था (आ.सी.ए.आय.) आणि महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियमाद्वारे निर्देशित केलेल्या मापदंडानुसार आम्ही आमचे लेखापरिक्षण केलेले आहे. त्या मापदंडानुसार लेखापरिक्षणाचे नियोजन व कार्य असे असावे की ज्या योगे या हिशोबात लक्षणीय चुका नाहीत याची सर्वसाधारण अशी खात्री देता येईल.

४) लेखापरिक्षणामध्ये आर्थिक पत्रकामध्ये दाखविलेल्या रकमा व केलेली विधाने याबाबतचे योग्य पुरावे मिळविणे व त्याची तपासणी करणे यांचा अंतर्भाव असतो. लेखापरिक्षकांनी अंमलात आणलेली कार्यपध्दती ही लेखापरिक्षकांचे स्वतःचे अंदाज, तसेच आर्थिक पत्रकांमधील दप्तरी चूक अथवा अपहार अशी कोणतीही महत्वाची अनियमितता यामुळे होणारे धोके यांचे मुल्यमापन करणारी आहे. या जोखमीची पडताळणी करताना लेखापरिक्षकाने संस्थेच्या आर्थिक पत्रके तयार करण्याच्या व सादर करण्याच्या अंतर्गत नियंत्रणाबाबत विचार करुन लेखापरिक्षण कार्याची त्या परिस्थितीतील कार्यपध्दती ठरविली पाहिजे. लेखापरिक्षणामध्ये जी हिशोबाची धोरणे अंमलात आणली आहेत ती पडताळणे, व्यवस्थापनाने जे महत्वपुर्ण अंदाज केले आहेत त्याबाबत योग्य निष्कर्ष काढणे तसेच सर्वसाधारणपणे आर्थिक पत्रकांच्या सादरीकरणाचे मुल्यमापन करणे याचा समावेश आहे.

५) लेखापरिक्षण कार्यातून मिळालेला पूरावा हा आमच्या लेखापरिक्षणाच्या मतास पुरकता देत असल्याबाबतची आम्हास खात्री झाली आहे.



Scanned by CamScanner

**लेखापरिक्षकाची मत–**

६) आमच्या लेखापरिक्षणाच्या उद्देशासाठी आमच्या संपूर्ण ज्ञानाप्रमाणे व विश्वासाप्रमाणे जरुर ती माहिती व खुलासे उपलब्ध झाले आहेत.

आमच्या माहितीप्रमाणे तसेच आम्हांस देण्यात आलेल्या खुलाशावरुन हे हिशोब महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० व महाराष्ट्र सहकारी संस्था नियम १९६१ व अन्य लागू कायदे तसेच निबंधकांनी वेळोवेळी जारी केलेल्या परिपत्रकान्वये अपेक्षीत अशा रितीने आवश्यक अशी सर्व माहिती देतात आणि भारतात सर्व सामान्य असणाऱ्या जमाखर्चाच्या तत्वाप्रमाणे संस्थेची सत्य व रास्त परिस्थिती दर्शवितात.

(अ) ताळेबंदाच्या बाबतीत दि. ३१/०३/२०१७ च्या संस्थेच्या परिस्थितीची.

(ब) नफा–तोटा पत्रकाच्या बाबतीत दि. ३१/०३/२०१६ रोजी संपणाऱ्या वर्षाच्या नफ्याची / तोट्याची आम्ही सोबत जोडलेल्या लेखापरिक्षण अहवाल भाग अ,ब, व क मधील केलेल्या अवलोकनास पात्र राहून सत्य व रास्त स्थिती दर्शविते आहे.

**इतर कायदेशिर व नियामक बाबतीतील अहवाल–**

७) ताळेबंद व नफा–तोटा पत्रक हे महाराष्ट्र राज्य सहकारी संस्था अधिनियमातील तरतूदीनुसार तयार करण्यात आलेली आहे.

८) आम्ही अहवाल करतो की,

अ) लेखापरिक्षणाचे उद्देशासाठी माझ्या संपूर्ण ज्ञानाप्रमाणे, माहितीप्रमाणे व विश्वासाप्रमाणे आम्हास जरुर ती सर्व माहिती आणि खुलासे उपलब्ध झाले आहेत आणि ते समाधानकारक आहेत.

ब) आमच्या तपासणीतून जितपत दृष्टोत्पत्तीस येईल त्याप्रमाणे संस्थेचे आम्ही तपासलेले सर्व व्यवहार संस्था अधिकाराच्या मर्यादेतच केलेले आहेत.

क) आमच्या लेखा परिक्षण कार्यास आवश्यक असणारी विवरणपत्रके संस्था कार्यालयाने सादर केली असून ती योग्य व परिपूर्ण आहेत.

९) आमच्या मते सोबत जोडलेला ताळेबंद व नफा–तोटा पत्रक संस्थेच्या हिशोबांच्या पुस्तकाशी व विवरणांशी जुळत आहे.

१०) तसेच आम्ही अहवाल करतो की,

अ) अहवालासोबत जोडलेला संस्थेचा ताळेबंद, नफा–तोटा पत्रक संस्थेच्या हिशोबाच्या पुस्तकाशी व विवरणाशी जुळत आहे

ब) आमच्या मते पुस्तकांच्या तपासणीतून जितपत दृष्टोत्पत्तीस येईल त्यावरुन संस्थेने कायद्यानुसार आवश्यक व योग्य ती हिशोबाची सर्व पुस्तके ठेवली आहेत.

क) संस्थेचा लेखापरिक्षण अहवाल तयार करतांना स्वतंत्र लेखापरिक्षकांनी केलेल्या लेखापरिक्षण अहवालाचा विचार करणेत आला आहे.

ड) सहकारी वर्ष सन २०१६–१७ करिता संस्थेस लेखापरिक्षण वर्ग **'ब'** देणेत आला आहे.

**यु. एस. कदम**
पार्टनर
मे. कदम ॲण्ड कंपनी
चार्टड अकौंटंटस्, अहमदनगर करीता

स्थळ : आदिनाथनगर
दिनांक ३१/०७/२०१७

Scanned by CamScanner

# श्री वृद्धेश्वर सहकारी साखर कारखाना लि.,

## दि. ३१/०३/२०१७ रोजीचे

| दि. ३१/०३/२०१६ रक्कम रुपये | भांडवल व देणी | परिशिष्ट क्रमांक | दि. ३१/०३/२०१७ रक्कम रुपये | रुपये |
|---|---|---|---|---|
| १३,५९,९८,५९२ | १. भाग भांडवल | १ | | १४,०६,८८,११७ |
| ३२,३२,३३,३८१ | २. गंगाजळी व इतर निधी | २ | | ३३,८१,६७,२५३ |
| | ३. कर्जे | | | ७५,७५,३९,३३९ |
| ८५,१३,३८,३८३ | अ. तारणावरील कर्जे | ३ | ५१,९१,०४,४८४ | |
| १८,८४,१६,१२७ | ब. बिगर तारणावरील कर्जे | ४ | २३,८४,३४,८५५ | |
| २,३३,११,८७० | ४. ठेवी | ५ | | २,३१,९८,८०६ |
| | ५. चालू देणी व तरतुदी | | | २०,८१,०८,९५९ |
| ८,८९,९२,८६४ | अ. शासकीय देणी | ६ | ८,८५,१२,८०३ | |
| ६८,११,१९३ | ब. ऊस बिलातील व इतर वसुली | ७ | ६८,५७,००४ | |
| २४,९१,१५,१६० | क. इतर देणी | ८ | १०,७४,८२,२२९ | |
| ६४,१६,७०९ | ड. बोनस व सानुग्रह अनुदान तरतूद | | ५२,५६,९२३ | |
| ७०,२५,७७१ | ६. व्याज देणे | ९ | | ७०,८२,१९१ |
| १,८८,०६,६०,०५० | एकूण | | | १,४७,४७,८४,६६५ |

| लेखा परीक्षण अहवाल भाग 'अ' 'ब' 'क' मधील शेऱ्यास पात्र राहून | एस. टी. राजळे<br>चिफ अकौंटंट | आर. जे. महाजन<br>सहा. सचिव | बी. एम. गोरे<br>सरव्यवस्थापक |
|---|---|---|---|

यु. एस. कदम
मे. कदम ॲण्ड कंपनी
चार्टर्ड अकौंटंटस्,
अहमदनगर करीता

**संचालक मंडळ**

| | | |
|---|---|---|
| बा. ब. मचे | सु. मा. बुधवंत | सा. बा. देशमुख |
| सौ. सिंधूबाई म. जायभाये | श्रीमती वच्छलाबाई का. कचरे | श्री. ए. मिसाळ |
| बा. रं. किलबीले | रा. आ. राजळे | ना. तु. बर्डे |



Scanned by CamScanner

# आदिनाथनगर, ता. पाथर्डी, जि. अहमदनगर

## ताळेबंद पत्रक

| दि. ३१/०३/२०१६ रक्कम रुपये | जिंदगी व येणी | परिशिष्ट क्रमांक | दि. ३१/०३/२०१७ रक्कम रुपये | रुपये |
|---|---|---|---|---|
| | **१. हातावरील व बँकेतील शिल्लक** | | | १९,९७,३३७ |
| ५,४४६ | अ. हातावरील रोख शिल्लक | | ४,३०२ | |
| १,९१,९९,१०३ | ब. बँकेतील शिल्लक | १० | १९,९३,०३५ | |
| २,०१,२९,७५० | **२. गुंतवणूक** | ११ | | २,०१,२९,७५० |
| | **३. ॲडव्हान्सेस व येणी** | | | ६,७२,९०,२६८ |
| ३०,६२,४४५ | अ. ॲडव्हान्सेस | १२ | ४४,०८,९७७ | |
| ६२,६७,७९७ | ब. डिपॉझिटस् | १३ | ५८,९८,४०१ | |
| ३,७०,८०,३७८ | क. इतर येणी | १४ | ५,६९,८२,८९० | |
| | **४. चालु जिंदगी** | | | ३५,२६,७०,७३७ |
| २,५०,२६,५७१ | अ. स्टोअर्स व स्पेअर्स | १५ | २,३८,४३,१८८ | |
| ८८,७६,३१,१९५ | ब. साखर व उपपदार्थ शिल्लक साठा | १६ | ३२,८८,२७,५४९ | |
| ६४,१७,४१,१७२ | **५. कायम जिंदगी** | १७ | | ६४,५२,९५,२५५ |
| | **६. अमूर्त भांडवली व अन्य खर्च** | | | २१,८६,७७० |
| १२,४५,४४३ | अ. प्रिपेड विमा | | ७,८७,२५९ | |
| ११,६४,९१३ | ब. उभी पीके | | १३,१८,७३३ | |
| ८०,७७८ | क. प्रिपेड खर्च | | ८०,७७८ | |
| ४,८०,००,००० | ७.१) डेफर्ड रेव्हेन्यु एक्सपेंडिचर | | ४,८०,००,००० | १२,८४,४४,०३५ |
| ८,०४,४४,०३५ | २) डेफर्ड रेव्हेन्यु एक्सपेंडिचर | | ८,०४,४४,०३५ | |
| | **८. नफा तोटा खाते** | | | २५,६७,७०,५१३ |
| ९,९३,६४,२३४ | २०१५-१६ अखेरचा संचीत तोटा | | १०,९५,८१,०२४ | |
| १,०२,१६,७९० | अधिक २०१६-१७ मधील तोटा | | १४,७१,८९,४८९ | |
| १,८८,०६,६०,०५० | एकुण | | | १,४७,४७,८४,६६५ |

| | | | |
|---|---|---|---|
| **जे. आर. पवार** | **मा. आ. राजीव राजळे** | **रा. का. काकडे** | **आप्पासाहेब दा. राजळे** |
| कार्यकारी संचालक | संचालक | व्हा. चेअरमन | चेअरमन |

### संचालक मंडळ

| | | | |
|---|---|---|---|
| अ. शि. फलके | सु. बा. ताठे | पां. आ. खेडकर | उ. र. वाघ |
| भ. कों. पाचरणे | त्रिं. ह. खेडकर | चा. उ. वाघ | श. ह. अकोलकर |
| | कों. रा. नरोटे | सु. भु. अंदुरे | |



Scanned by CamScanner

# श्री वृद्धेश्वर सहकारी साखर कारखाना लि., आदिनाथनगर

### ता. पाथर्डी, जि. अहमदनगर

### दि. ३१/०३/२०१७ रोजी संपणाऱ्या वर्षाच्या ताळेबंदाचे परिशिष्ट क्र. १

## अधिकृत व वसूल झालेले भागभांडवल

| दि. ३१/०३/२०१६ रक्कम रुपये | | तपशिल | | दि. ३१/०३/२०१७ रक्कम रुपये |
|---|---|---|---|---|
| | १)अ | **अधिकृत भाग भांडवल** | | |
| १८,४२,००,००० | १ | उत्पादक सभासदांचे १८,४२० भाग प्रत्येकी रु. १०,०००/- दर्शनी किंमतीचे | | १८,४२,००,००० |
| १०,००,००० | २ | सहकारी संस्था व बिगर उत्पादक सभासदांचे १०० भाग प्रत्येकी रु. १०,०००/- दर्शनी किंमतीचे | | १०,००,००० |
| ४५,४५,००० | ३ | ४५५ भाग अग्रहक्काचे परतफेडीचे प्रत्येकी रु. १०,०००/- दर्शनी किंमतीचे महाराष्ट्र सरकारला दिलेले. | ४५,५०,००० | ४५,४५,००० |
| | | वजा अर्ध्या (१/२) भागाची किंमत कमी मिळाल्याने फरक रक्कम | ५,००० | |
| ६,८९,००,००० | ४ | ६,८९० भाग अग्रहक्काचे परतफेडीचे प्रत्येकी रु. १०,०००/- दर्शनी किंमतीचे महाराष्ट्र सरकारला दिलेले. | | ६,८९,००,००० |
| **२५,८६,४५,०००** | | **एकूण 'अ'** | | **२५,८६,४५,०००** |
| | १)ब | **विक्रीस काढलेले भाग भांडवल** | | |
| १८,४२,००,००० | १ | १८,४२० भाग प्रत्येकी रु. १०,०००/- दर्शनी किंमतीचे उत्पादक सभासदांचे | | १८,४२,००,००० |
| १०,००,००० | २ | १०० साधे भाग प्रत्येकी रु. १०,०००/- दर्शनी किंमतीचे सहकारी संस्था व बिगर उत्पादक सभासदांसाठी | | १०,००,००० |
| ४५,४५,००० | ३ | ४५५ भाग अग्रहक्काचे परतफेडीचे प्रत्येकी रु. १०,०००/- दर्शनी किंमतीचे महाराष्ट्र सरकारला दिलेले | ४५,५०,००० | ४५,४५,००० |
| | | वजा अर्ध्या (१/२) भागाची किंमत कमी मिळाल्याने फरक रक्कम | ५,००० | |
| ६,८९,००,००० | ४ | ६,८९० भाग अग्रहक्काचे परतफेडीचे प्रत्येकी रु. १०,०००/- दर्शनी किंमतीचे महाराष्ट्र सरकारला दिलेले | | ६,८९,००,००० |
| **२५,८६,४५,०००** | | **एकूण 'ब'** | | **२५,८६,४५,०००** |
| | १) क | **खपलेले व वसुल झालेले भाग भांडवल** | | |
| ९,०१,४९,३४८ | १ | १४,०६१ भाग प्रत्येकी १०,०००/-दर्शनी किंमतीचे उत्पादक सभासदांनी घेतलेले | १४,०६,१०,००० | ९,६५,०७,७०२ |
| | | (-) भागापाटी येणे रक्कम | ४,४१,०२,२९८ | |
| ७,७९,५०५ | २ | १०० साधे भाग प्रत्येकी रू.१०,०००/- दर्शनी किंमतीचे सहकारी संस्था व बिगर उत्पादक सभासदांनी घेतलेले | १०,००,००० | ७,८२,००५ |
| | | (-) भागापोटी येणे रक्कम | २,१७,९९५ | |
| -- | ३ | ४५५ भाग अग्रहक्काचे परतफेडीचे प्रत्येकी रू.१०,०००/- दर्शनी किंमतीचे महाराष्ट्र सरकारला दिलेले | ४५,४५,००० | -- |
| | | (-) शासकीय भागभांडवल परतफेड रक्कम | ४५,४५,००० | |
| ३,५४,४५,००० | ४ | ६८९० भाग अग्रहक्काचे परतफेडीचे प्रत्येकी रू.१०,०००/- दर्शनी किंमतीचे महाराष्ट्र सरकारला दिलेले | ६,८९,००,००० | ३,५०,४५,००० |
| | | (-) शासकीय भागभांडवल परतफेड रक्कम | ३,३८,५५,००० | |
| **१२,६३,७३,८५३** | | **एकूण 'क'** | | **१३,२३,३४,७०७** |
| ४८,५४,१७४ | २ | **भाग अनामत** | | ४८,३९,२४९ |
| | ३ | **बेनिफिशरी** | | |
| ४६,१९,२५५ | | **अ) सभासद भाग भांडवल** | | ३३,८९,५४१ |
| १,५१,३१० | | **ब) सभासद भाग अनामत** | | १,२४,६२० |
| **१३,५९,९८,५९२** | | **एकूण (१'क'+२+३)** | | **१४,०६,८८,११७** |



Scanned by CamScanner

## दि. ३१/०३/२०१७ रोजी संपणाऱ्या वर्षाच्या ताळेबंदाचे परिशिष्ट क्र. २
### गंगाजळी व इतर निधी

(रक्कम रुपये)

| अ. नं. | तपशिल | ३१/०३/२०१६ अखेर बाकी | चालू वर्षातील वाढ | चालू वर्षातील घट | ३१/०३/२०१७ अखेर बाकी |
|---|---|---|---|---|---|
| अ. | गंगाजळी | ४१,२३,७१७ | १,६१,०२९ | - - | ४२,८४,७४६ |
| ब. | इतर निधी | | | | |
| १ | घसारा निधी | ३१,२६,७०,२१९ | १,४७,७२,८४३ | - - | ३२,७४,४३,०६२ |
| २ | संशयित व बुडीत निधी | ६४,३९,४४५ | -- | - - | ६४,३९,४४५ |
| | एकूण | ३२,३२,३३,३८१ | १,४९,३३,८७२ | - - | ३३,८१,६७,२५३ |

## दि. ३१/०३/२०१७ रोजी संपणाऱ्या वर्षाच्या ताळेबंदाचे परिशिष्ट क्र. ३
### तारणावरील कर्जे

| दि. ३१/०३/२०१६ रक्कम रुपये | तपशिल | दि. ३१/०३/२०१७ रक्कम रुपये |
|---|---|---|
| | **१. मध्यम मुदत कर्जे** | |
| | **दि. अहमदनगर डि. सें. को. ऑप बँक लि., अहमदनगर** | |
| ६,३०,०४,००० | १. साखर मालतारण अपुरा दुरावा रूपांतरीत कर्ज RRTL | ४,७२,५३,००० |
| १३,५७,०५,००० | २. भारत सरकार अबकारी कर कर्ज सेफासु २०१४ | ९,०४,७०,००० |
| २,९२,८४,००० | ३. भारत सरकार एफआरपी सॉफ्ट लोन २०१५ | २,९२,८४,००० |
| - - | ४. महाराष्ट्र शासन सॉफ्ट लोन २०१५ | ३,४४,३५,००० |
| २२,७९,९३,००० | एकूण -१ | २०,१४,४२,००० |
| | **२. खेळते भांडवली कर्जे** | |
| | **दि.अहमदनगर डि.सें.को.ऑप बँक लि.,अहमदनगर** | |
| ९,५३,०२,०१० | १. साखर मालातरण २ ब २०१४-१५ | -- |
| २९,९१,०५,५९० | २. साखर मालतारण १ अ २०१५-१६ | -- |
| १८,४३,०५,२४९ | ३. साखर मालतारण २ ब २०१५-१६ | ७,०९,१४,७५० |
| ३,०३,८८,८२१ | ४. साखर मालतारण ३ ड २०१५-१६ | -- |
| १,४२,४३,७१३ | ५. स्टोअर्स माल नजर गहाण | १,४५,३९,५२१ |
| - - | ६. साखर मालातरण १ अ २०१६-१७ | १८,६४,२९,१६२ |
| - - | ७. साखर मालातरण २ ब २०१६-१७ | ४,५७,७९,०५१ |
| ६२,३३,४५,३८३ | एकूण - २ | ३१,७६,६२,४८४ |
| **८५,१३,३८,३८३** | **एकत्रित एकूण (१+२)** | **५१,९१,०४,४८४** |

## दि. ३१/०३/२०१७ रोजी संपणाऱ्या वर्षाच्या ताळेबंदाचे परिशिष्ट क्र. ४
### - बिगर तारणावरील कर्जे -

| दि. ३१/०३/२०१६ रक्कम रुपये | तपशिल | दि. ३१/०३/२०१७ रक्कम रुपये |
|---|---|---|
| १४,३२,१२,०३० | १. ऊस तोडणी वाहतूक खेळते भांडवल कर्जे (SBI) २०१६-१७ | १८,२४,९८,१९३ |
| ४,५२,०४,०९७ | २. अल्प मुदत कर्ज अे.डी.सी.सी.बँक लि., २०१६-१७ | ५,५९,३६,६६२ |
| **१८,८४,१६,१२७** | **एकूण** | **२३,८४,३४,८५५** |



Scanned by CamScanner